
काव्यगंधाची
रसयात्रा
शैलजा देशमुख

कवीच्या मनातील भाव–भावनांचा, आंदोलनांचा उत्कट साहित्याविष्कार म्हणजे कविता! प्रत्येक कवीचं भावविश्व, अनुभवविश्व वेगळं; त्यानुसार त्या–त्या कवीचा कवितेतून व्यक्त होतानाचा आशय, रचना, भाषाशैली वेगवेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण!

तरीही काही समान विषयांवर व्यक्त होताना वेगवेगळ्या कवींना त्यातले कोणकोणते पैलू भावतात, भिडतात, मनात रुंजी घालतात आणि त्याची कविता होते, हे पाहणे देखील मनोहारी असते!

नेमका हाच धागा पकडून प्रस्तुत पुस्तकात 'पाऊस', 'फुले', 'शिशिरऋतू', 'आई', 'शाळा', 'स्वातंत्र्य' इ. निवडक आठ विषयांवर वेगवेगळ्या कवी/कवयित्रींनी लिहिलेल्या कवितांचा रसास्वाद लेखिका शैलजा देशमुख यांनी खास तुम्हा कुमारांसाठी केला आहे. त्यातून त्या–त्या विषयाचे अनेक पदर, पैलू तुम्हाला उलगडत जातील, भाषेचे–रचनेचे सौंदर्य, शैलीतील वैविध्य लक्षात येईल! तुमच्यातील संवेदनशीलता वाढीस लागेल आणि कवितेकडे बघण्याची नवी दृष्टी तुम्हाला मिळेल!!

काव्य रसग्रहणात्मक
छात्र प्रबोधन प्रकाशन, पुणे
किंमत ₹ १२०
jpprakashane.org या संकेतस्थळावर उपलब्ध

# काव्यगंधाची रसयात्रा



लेखिका
शैलजा देशमुख

छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०

**'काव्यगंधाची रसयात्रा'**
('छात्र प्रबोधन' मध्ये १९९५ ते २००० या कालावधीत प्रकाशित झालेल्या काव्य रसग्रहणात्मक लेखांचे संकलन, संपादन)

**प्रकाशक व मुद्रक**
प्रा. महेन्द्र सेठिया
संपादक, ''छात्र प्रबोधन',
ज्ञान प्रबोधिनी, पुणे 411030
☎ (020) 24207 174/175
**email - chhatraprabodhan@jnanaprabodhini.org**

**लेखिका**
शैलजा देशमुख
सी - १०२, पाटे संस्कृती,
सहकारनगर क्र. २, पुणे - ०९
मोबाइल - ९४२२६७१५६९,
**email - sgdeshumkh50@gmail.com**

© स्वामित्व प्रकाशकाच्या स्वाधीन

**अक्षरजुळणी**
छात्र प्रबोधन,
ज्ञान प्रबोधिनी, पुणे-३०

**मुखपृष्ठ व आतील चित्रे**
चित्रांजली

**सजावट**
राहुल धामणे

**वितरण**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०
ऑनलाइन खरेदीसाठी **jpprakashane.org**

**प्रथम आवृत्ती :** राष्ट्रीय सौर माघ, शके १९४४
फेब्रुवारी २०२३

**किंमत**
₹ १२०/-

**''Kavyagandhachi Rasayatra''**
**(Pre-published and edited articles on poem appriciation from Chhatra Prabodhan Magazine)**

# प्रस्तावना

मुलांनो, तुमच्यासाठी हे एक वेगळंच पुस्तक शैलजाताईंनी लिहिलं आहे. कवितांच्या जगात तुम्हाला घेऊन जाणारं पुस्तक. तुमच्या आमच्या भोवतीचा परिसर, तिथली झाडं, पशु-पक्षी, तिथली माणसं आपण नेहमी पाहतो. सहा ऋतूंचं येणं नेहमी अनुभवतो, आपलं घर आणि घरातल्या माणसांशी असलेलं नातं आपल्याला चांगलं ठाऊक असतं; पण कुणीतरी आपल्याला त्या आपल्या भवतालाची वेगळीच ओळख करून देतं. कधी आनंद देणारी, तर कधी डोळ्यांत पाणी आणणारी ओळख!

काही गोष्टी अशा असतात की, ज्या डोळ्यांना दिसत नाहीत, फक्त मनाने अनुभवायच्या असतात. आईचं प्रेम, पुरात बुडून गेलेल्या गावाचं दुःख, बागेत मरून पडलेल्या फुलपाखरांसाठी वाटलेली हळहळ... अशी सुखदुःख बोटानं दाखवता येतं नाहीत; पण कविता ती सगळी सुखदुःख आपल्या मनाला दाखवतात, अनुभवायला लावतात.

इतिहासाचे सन आपल्याला अभ्यासात माहीत असतात. भूगोलाचे नकाशे असतात. देशाचे नाव कुठे ना कुठे येतं सारखं; पण कविता इतिहासातल्या माणसांना, प्रसंगांना जिवंत करतात. कागदावरच्या रेषांनी नव्हे, तर कवितांच्या शब्दांनी भूगोल प्रत्यक्ष उभा राहतो आपल्यासमोर! देश म्हणजे काय, हे हळूहळू कळू लागतं...

मुलांनो, कवितेची अशी ओळखं तुम्हाला व्हावी, कविता तुम्हाला आवडावी, अर्थ समजून तुम्ही ती गुणगुणावी, आठवावी आणि तशा नव्यानव्या कविता शोधत तुम्ही जात राहावं यासाठी ही गारुड्याची पुंगी वाजतेय या पुस्तकात! त्या आवाजाचा नाद लागून कवितांच्या मागे जाणार ना?

**– अरुणा ढेरे**

# मनोगत

विद्यार्थी मित्रांनो, गंध मोहवी काव्याचा भाग १-२ या दोन पुस्तकातून आपण मराठी वाङ्मयातील कवितेचे दालन समृद्ध करणाऱ्या वीस कवींच्या कवितांचा रसास्वादात्मक परिचय करून घेतला. 'काव्यगंधांची रसयात्रा' हे तसं म्हटलं तर या मालिकेतील तिसरे पुस्तक! मात्र येथे एकेका कवीच्या कवितांचा परिचय करून न घेता, एकाच विषयावर वेगवेगळ्या कवींनी लिहिलेल्या कवितांचा रसास्वादाच्या अंगाने वेध घेण्याचा प्रयत्न केलाय...

उदा. 'फुलं'या एकाच विषयावरील विविध कविता वाचताना जाणवतं फुलांचा रंग, गंध तर कविमनाला भावतोच; त्याचबरोबर वेगवेगळ्या फुलांशी कवीचं जुळलेलं नातं, मनात उमटणारं भावचित्र, मनात जाग्या होणाऱ्या आठवणी, त्या-त्या ऋतूशी, सण-उत्सवांशी फुलांचं निगडित असणं असे एक ना अनेक पैलू!

विषय एकच असला तरी त्या-त्या प्रादेशिक वातावरणाचं भाषेचं प्रतिबिंब कवितांतून दिसतं. 'आई' विषयीचा जिव्हाळा, प्रेम, सार्वत्रिक, सार्वकालिक तेच असलं, तरी कवितेतील सामाजिक, आर्थिक संदर्भानुसार 'आई'ची प्रतिमा उभी राहते. कवितेतला 'पाऊस' नेहमीच रम्य नसतो; कारण प्रत्येक प्रांतातलं त्याचं बरसणं वेगळं; तसंच तो झेलणाऱ्याची परिस्थितीही वेगवेगळी! कधी तो निसर्गाचा मनोरम आविष्कार भासतो; तर कधी वास्तवाचे चटके बसणाऱ्याला 'नकोसा' वाटतो.

असं आशयाचं वैविध्य तसं रचनेचही! कधी वृत्तबद्ध, अलंकारीक भाषा, तर कधी मुक्तछंदाची लय पकडणारी भाषा!

या पुस्तकात पानांच्या मर्यादेमुळे फक्त आठ विषयांवरील कवितांचा परामर्श घेतला आहे. विचार केलात, तर असे अनेक विषय तुम्हाला सुचतील. आजी-आजोबा, इतर नातेसंबंध, सुट्टी, सण-उत्सव, गुरू, समाजातील आजूबाजूच्या घटनांचा परामर्श घेणाऱ्या कविता... वगैरे वगैरे!

एखादा विषय निवडा. त्या दिशेने कवितांचा शोध घ्या... वाचताना तुम्हाला खूप खूप आनंद तर मिळेलच; पण एखाद्या विषयाकडे किती वेगवेगळ्या कोनातून बघता येते, व्यक्त होता येते याची दृष्टी मिळेल. त्यातून कदाचित नकळत तुम्हाला अभ्यासालाही पूरक गोष्टी सुचतील. उदा. प्रकल्पाचा विषय, निबंधासाठी मुद्दे, छान कवितांच्या स्मरणात ठेवण्यासारख्या ओळी... अर्थात हा झाला दृश्य आणि मर्यादित उपयोग! पण कवितेशी होणारी मैत्री तुम्हाला आयुष्यभरासाठी जपून ठेवण्यासारखी असेल!

**- शैलजा देशमुख**

# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावना | ४ |
| | मनोगत | ५ |
| १. | इतिहासाचे मंगल 'गान' | ७ |
| २. | कविता आईच्या | १७ |
| ३. | कवितेतला पाऊस | ३१ |
| ४. | शब्दफुले अक्षरली | ४५ |
| ५. | शिशिरऋतूचे गान | ५८ |
| ६. | कविता सांगती कथा | ६८ |
| ७. | कवितेच्या तालावर झुलणारी शाळा | ९२ |
| ८. | कविता स्वातंत्र्याची | १०९ |